# काविळ

**काविळ म्हणजे काय?**

काविळ म्हणजे डोळे आणि त्वचा पिवळी होणे. शरीरातील बिलुरुबिनचे प्रमाण वाढल्यामुळे असे होते. जेंव्हा यकृताकडून लाल रक्तपेशी तोडल्या जातात, तेंव्हा बिलुरुबिन हा घटक पदार्थ निर्माण होतो. काविळ हे यकृत, स्वादुपिंड किंवा पित्ताशय यांच्या समस्यांचे लक्षण असू शकते. जनुकीय दोष ॲसिटामिनोफेन सारखी औषधे किंवा अल्कोहोलचे अधिक प्रमाणात वापर यामुळेही काविळ होऊ शकते.

**कारणे-**

- ✓ यकृतास विषाणू संसर्ग जसे हिपॅटिटीस A, B &C
- ✓ मद्यामुळे होणारे यकृताचे आजार
- ✓ पित्त वाहून नेणा-या नलिकेत पित्ताचे खडे होणे(सर्वसाधारणपणे आढळते) किंवा टयूमर
- ✓ औषधामुळे किंवा वनस्पतीमुळे विषबाधा
- ✓ अपेक्षित वेळेपूर्वी जन्माला येणे
- ✓ हिपॅटिसीस हा विषाणूजन्य आजार असलेल्या व्यक्तीशी संभोग करणे.
- ✓ जन्माच्या वेळी लक्षणीय जखमा होण

**चिन्हे आणि लक्षणे-**

- ✓ गडद रंगाची लघवी होणे
- ✓ फिकट व राखाडी रंगाचा मल होणे
- ✓ खाज येणे
- ✓ गोंधळलेपणा
- ✓ थकवा किंवा अकारण वजन कमी होणे
- ✓ स्नायू व सांधे दुखणे
- ✓ मळमळ, उलटया किंवा पोटात दुखणे




**निदान-**

- ✓ लघवीची तपासणी
- ✓ यकृताचे कार्य आणि रक्त तपासणी
- ✓ अल्ट्रासाऊंड स्कॅन
- ✓ कॉम्पयुटराईज्ड टोमोग्राफी (CT)स्कॅन
- ✓ मॅग्नेटीक रेझोनन्स इमेजिंग (MRI ) स्कॅन

**उपचार-**

- ✓ बिलुरुबीनची पातळी कमी करणे आणि खाज कमी करणे यासाठी औषधे देता येतात.
- ✓ संसर्गामुळे झालेली काविळ किंवा कावीळ होण्यासारखी कठीण गुंतागुंतीची परिस्थिती उद्भावल्यास त्यावरील उपचारासाठी प्रतिजैविके औषधांचा वापर करतात.
- ✓ लाल रक्त पेशी फुटल्याने झालेल्या पंडुरोगात किंवा रक्तस्त्राव झाल्यास रक्तसंक्रमणाची एखाद्यास गरज असते.
- ✓ शस्त्रकिया आणि काही तीव्र कारवाईची गरज काविळ रुग्णांबाबत निर्माण होते. जसे पित्ताचे खडे झाल्यास शस्त्रक्रिया करावी लागते.

**रुग्ण समुपदेशन-**

- ❖ सुचनेनुसार द्रवपदार्थांचे सेवन करावे . द्रव पदार्थांमुळे पाण्याची पातळी टिकून राहते, आणि लघवी होते, त्यामुळे मूत्रपिंडास इजा होण्याची शक्यता कमी.
- ❖ कमी मेद घटक असलेले अन्न खावे. पोषक, कमी मेद घटक असलेले म्हणजे फळे, भाज्या, अखंड धान्याची भाकरी, पोळी, कमी मेदाची दुग्ध उत्पादने , शेंगभाज्या, मटण आणि मासे असे अन्न पचायला हलके असते आणि लक्षणे कमी करण्यास मदत करते.
- ❖ मद्यपान करु नये. मद्यामुळे यकृतास हानी होते व लक्षणे तीव्र होतात.